| MHAU090029772016 | **रे.मु.नं. २६६/२०१६**<br>**लक्ष्मीबाई वि. इंद्रमोहन** |
|---|---|

## निशाणी क्र. ३२ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे. वादीचे म्हणणे आहे की, प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यात वादी –प्रतिवादीच्या कथनानुसार दावा जमीन गट नं. १७५ ची तालुका निरीक्षक भूमि अभिलेख पैठण यांच्या मार्फत मोजणी झाली आहे. त्यानुसार वादीच्या मालकीच्या जमीनीवर प्रतिवादींनी ११ आर क्षेत्रावर अतिक्रमण केलेले आहे. सदर ११ आर जमीन बेकायदेशीररित्या प्रतिवादीच्या ताब्यात आहे. या जमीनीचा ताबा मिळणेकामी सदर दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी तर्फे नि. ३३ वर खुलासा दाखल केला आहे व अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादींनी आक्षेप घेतला आहे की, प्रतिवादीच्या पुर्वीच्या मालकाने गट नं. १७५ मधील पुर्वेकडील २–२ एकरचे दोन खरेदीखतानुसार सदर जमीनीतील पुर्वेकडील व उत्तरेकडील रस्त्याचे क्षेत्र सोडून विकत घेतले व तसे स्पष्टपणे खरेदीखतात नमूद आहे. असे असतांना सदर रस्त्यामध्ये गट नं. १७५ मध्ये गेलेले क्षेत्र गट नं. १७५ च्या सात–बारा उता–यामधून कमी झालेले नव्हते. त्यामुळे सात–बारा उता–याला शिल्लक असलेले क्षेत्र वादीने मुळ मालकाकाडून लिहून घेतले. वादी करु पहात असलेली दुरुस्ती चुकीची व बेकायदेशीर आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. अर्ज व खुलासा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे कारणांसहीत निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणे**

**मुद्दा क्र. १ व २ करीताः**–

४. दाव्याची व अभिलेखाची पाहणी केली असता हे स्पष्ट होते की, वादीने निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे. वादीचे म्हणणे आहे की, जमीन गट नं. १७५ ची भुमी अभिलेख पैठण यांच्या मार्फत दि. १३/०२/२०२० रोजी मोजणी झाली. त्यामध्ये वादीच्या जमीनीवर ११ आर क्षेत्रावर प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर दाव्यात त्याअनुषंगाने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादीने सदरचे कथन नाकारले आहे.

५. वादीने निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दावा दिला होता परंतु वादीचे कथनानुसार मोजणीमध्ये प्रतिवादीने ११ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे दिसून येते. वादीला सदर ११ आर अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळण्याबाबत दाव्यात दुरुस्ती करावयाची आहे. प्रतिवादीने घेतलेले आक्षेपांचा विचार पुरावा नोंदवून गुणवत्तेवर करणे आवश्यक आहे.

६. वरील चर्चेवरुन दोन्ही पक्षकारांमधील वाद सोडविण्यासाठी दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे स्पष्ट होते. त्यामुळे अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे.

त्यामुळे मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून मुद्दा क्र.२ चे निष्कर्षार्थ खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. नि. ३२ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो. वादीला दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

२. वादीने मुदतीत दाव्यात दुरुस्ती करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN NARAYAN BHAVSAR
Date: 2023.03.20 10:44:32 +0530

दिनांकः– १६/०३/२०२३

( स. ना. भावसार )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पैठण

# Certificate

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rakesh Rajmadan Pedapalli |
| Name of the court | : | Judicial Magistrate F.C., Paithan |
| Date of judgment/order | : | 16/03/2023 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 16/03/2023 |
| Judgment/order uploaded on | : | 20/03/2023 |